॥ ॐ ॥

# ‘स्व’-रूपवर्धिनी कार्यवृत्त

जून
२०२४

२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे – ४११ ०११.

(कार्यालय दूरध्वनी) : २६१२१७०४ भ्रमणध्वनी : ९०११३८६३८६

Email : wardhinee@gmail.com

Website : http://www.swaroopwardhinee.org

---

‘‘बिनभिंतीची उघडी शाळा लाखो इथले गुरु,
झाडे, वेली, पशु, पाखरे यांसी गोष्टी करू’’

---



जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने संकल्प करू
पर्यावरण रक्षणाचा, निसर्गाला जपण्याचा.

## कामाचा प्रेरक संगम






सुरुवातीला हनुमान मेकडे आणि अक्षय कदम यांनी झालेल्या उपक्रमांचे विश्लेषण करत भागातील वर्धक व युवक यांची गुणवत्ता वाढवण्यासाठी शाखा संच आणि समिती घेत असलेल्या कष्टांची मांडणी भाग ४ च्या नियुक्ती कार्यक्रमात केली. आढावा ऐकल्यानंतर आपल्या कामाला सहज कोणीही लाखो रुपयांची देणगी देऊ शकेलच पण केवळ पैसे नाही तर वेळ देतो हा लाखमोलाचा शब्द देखील देतील, असा विश्वास वाटला. जुन्या अनुभवी युवकांनी शाखेत लक्ष घातले की कामाचा बळकट हिमालय कसा उत्साहाने उभा राहतो याचे उत्तम उदाहरण भाग ४ मध्ये जाणवत आहे.

या भागात ३ पिढ्या एकत्र नांदताना दिसत आहेत. दाते सर, किशाभाऊ, शि.प. यांनी घडवलेली अगदी पहिल्या टप्प्यातील पिढी, ज्यांचा सहवास जडणघडणीचा संस्कार करत आहे, वर्धिनीला ते वेगळ्या उंचीवर नेत आहेत. 'आपली ओळख, आपला निधी हे सगळं आपल्या कामासाठी', हा संस्कार ते रुजवत आहेत.

दुसरी पिढी संजू भैया, झापु यांच्या तालमीत तयार झालेली. जे आता संसारात स्थिरस्थावर होत आहेत पण संसाराचे, घर चालवायचे, नोकरी धंद्याचे कारण न देता ''आम्ही भरपूर वेळ देऊ, तुम्ही कामं सांगा,'' ह्या प्रेरणेने कामात वेळ देत आहेत. आत्ताची insta पिढी तर एकदम भारी. ३० सेकंदाच्या shorts reel मध्ये हे शाखेचे अख्खे जग दाखवू शकतात. एवढेसे लहान घर, घरातील लोकांचे तुटपुंजे रोजगार, आर्थिक कसरत या पार्श्वभूमीवर कोणतेही कारण न देता हे योद्धे कामाची शिवगर्जना करत आहेत. शाखेला बालशाखेची, बचत गटाची जोड मिळाली आहे.

अशा लहान-थोरांच्या संघटनाचा प्रेरक संगम इथे अनुभवायला मिळतो आहे.

## समुपदेशन विभाग



स्वरूपमित्र समुपदेशन विभागाकडून १३ मे ला वर्धिनीच्या शाखांमधील दहावी उत्तीर्ण ३८ विद्यार्थ्यांची कलचाचणी घेण्यात आली. अतिशय नियोजनबद्ध पद्धतीने मुलांची कलचाचणी घेऊन, कलचाचणीचा रिपोर्ट प्रत्येक विद्यार्थ्याला वैयक्तिक समुपदेशनाद्वारे समजावून सांगण्यात आला. यावेळी काही विद्यार्थ्यांचे पालकही उपस्थित होते.

- **त्यातील एका पालकांचे मनोगत -** माझी मुलगी अनुष्का चव्हाण ही ज्ञानज्योती अभ्यासिकेत आहे. दहावी झाल्यानंतर आम्ही तिची 'स्व'-रूपवर्धिनीमधून कल चाचणी करून घेतली. यातून तिने मेकअप आर्टिस्टचा एखादा कोर्स करावा असे मेघाताईंनी सुचवले. याशिवाय ताईंनी आम्हाला प्रवेश कसा आणि कुठे घ्यावा यासंदर्भातही मार्गदर्शन केले.

## उत्थान विभाग

- अभ्यासिका प्रमुखांच्या ५ मे रोजी झालेल्या मासिक प्रशिक्षणात Online Voucher कसे तयार करावे याचे प्रशिक्षण श्री. केदार भंडारे व श्री. सुमित डोळे यांनी घेतले.
- किशोरी विकास प्रकल्प - १२ मे रोजी कसबा भागातील किशोरी एकत्रिकरणात अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त मुलींना अहिल्यादेवीबद्दल माहिती सांगितली. २६ मे रोजी महात्मा फुले भागात किशोरी एकत्रिकरण घेण्यात आले. यामध्ये सौ. अनुजा ताई पाटील यांनी विविध खेळ, आणि कृती उपक्रमाच्या माध्यमातून भावना या विषयावर मुलींशी संवाद साधला.
- बुद्ध पौर्णिमेला डॉ. बाबासाहेब आंबेडकर वसाहत वस्तीतील मुलांना वही व पेन्सिलचे वाटप करण्यात आले.
- विभागातील कार्यकर्त्यांचे मेंटल हेल्थ सोल्जरचे प्रशिक्षण प्रज्ञाताई कानडे यांनी घेतले. अनेकदा आपणही नैराश्य अनुभवतो,

कामाच्या ठिकाणी असो अथवा इतर ठिकाणी. हे नैराश्य घालवण्यासाठी आपण मदत घेऊ शकतो, किंवा मदत करू शकतो हे या सत्राच्या माध्यमातून समजले. रोल प्ले, व्हिडिओ दाखवून ताईंनी सर्वांना बोलतं केलं, आणि प्रत्येकाला व्यक्त होता आलं.












१५ मे रोजी प्रियदर्शनी अभ्यासिकेत एका नवीन विद्यार्थ्याने प्रवेश घेतला. त्याच्याजवळ पाटी, पेन्सिल काही नव्हते. म्हणून ताईंकडून खडू घेऊन छानपैकी स्वतःचं नावं फरशीवर लिहिलं, आणि मी रोज येणार हेही सांगितलं. हे नाही ते नाही अशी तक्रार करत न बसता पुढं कसं जायचं हे इतक्या सहज सांगणारी पिढी अभ्यासिकेत येतीये याचा आनंद आहे.

## युवा विभाग

### दुष्काळी प्रदेश अभ्यास दौरा (बीड व धाराशिव)

'तयांच्या कळा जाणवाव्या आम्हाला,' या ओळींची अनुभूती देण्यासाठी वर्धिनीत नेहमीच विविध अनुभव कार्यकर्त्यांना दिले जातात. समाजाच्या खऱ्या प्रश्नांची जाणीव त्यांच्यात निर्माण करून भविष्यात त्यांनी हे सोडविण्यासाठी कटिबद्ध व्हावे यासाठी हा संस्कार केला जातो.

महाराष्ट्रात पर्जन्यमान सरासरीपेक्षा कमी होत आहे. दुष्काळ हा राज्याचा स्थायीभाव बनण्याच्या अवस्थेत आहे. याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी बीड व धाराशीव या दोन जिल्ह्यांत वर्धिनीच्या युवा कार्यकर्त्यांचे २ गट दि. २४ ते दि. २६ मे २०२४ या कालावधीत अभ्यास दौऱ्यासाठी रवाना झाले. बीड गटाचे प्रमुख आदित्य घोरपडे तर धाराशिव गटाचे प्रमुख केदार घाटगे यांनी दौऱ्याचे नेतृत्व केले.

मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त जिल्ह्यांची निवड करून काही निरीक्षणे मांडली. या दौऱ्याचा मुख्य उद्देश जिल्ह्याची दुष्काळी परिस्थिती तपासणे, व्यवस्थापनाच्या उपाययोजना समजून घेणे, पिण्याच्या पाण्याची वितरण व्यवस्था पाहणे, निसर्गनिर्मित व मानवनिर्मित दुष्काळ यांतील फरक समजून घेणे आणि उपाययोजना मांडणे हा होता.

दौऱ्यामध्ये मुख्यतः विविध

स्तरातील लोकांशी संवाद साधून जसे राजकीय नेते, प्रशासक, सामाजिक संस्था, नागरिक, त्यांच्या मते दुष्काळ काय, त्याची तीव्रता कशी आहे हे समजून घेतले. जिल्ह्याची भौगलिक परिस्थिती, हवामान स्थिती, पाण्याचे स्रोत, कृषि विकास, जनावरे, पशुपालन यांची माहिती घेत प्रत्यक्ष कार्यक्षेत्रावर जाऊन जलसाठ्यांचा मागोवा घेतला. दुष्काळाची कारणे आणि त्याचा होणारा परिणाम याचे गांभीर्य या अभ्यासातून समजले.

सर्व स्तरावर चर्चा केल्यावर गटाने काही उपाय सुचवले. जसे, जलसंधारण, भूजल पुनर्भरण, कृषी सुधारण, जनजागृती, आर्थिक सहाय्य. या उपायांवरती तहसीलदार, सरपंच, पोलिस पाटील, सामान्य नागरिक यांच्यासोबत चर्चा केली. या दोन्ही दौऱ्यांचा रितसर सविस्तर अभ्यासपूर्ण अहवालही कार्यकर्त्यांनी तयार केला. या अभ्यास दौऱ्याच्या निमित्ताने महाराष्ट्रातील एका भीषण प्रश्नाचे गांभीर्य कार्यकर्त्यांच्या लक्षात आले. वर्धिनीच्या शिकवणीप्रमाणे 'यावर उपाय' हेच भावी नागरिक शोधतील.










## पाकोळी बालवाडी



◆ **संस्कृत संभाषण शिबिर** - सर्व भाषांची जननी असलेली अत्यंत समृध्द आणि मधुर अशी संस्कृत भाषा अतिशय सोप्या पद्धतीने शिकण्याची सुवर्णसंधी संस्कृत भारती संस्थेकडून २ मे ते १३ मे या कालावधीत मिळाली होती. या वर्गात बालवाडीच्या सर्व शिक्षिकांनी सहभाग घेतला. संस्कृत भारतीचे श्री. शशिकांत शेंडे व श्रीमती सोनल दवे यांनी हे प्रशिक्षण घेतले. या वर्गात अन्य संस्थांचे प्रतिनिधीही सहभागी झाले होते. त्यामुळे नवीन परिचय होऊन वैचारिक देवाणघेवाण झाली. मुलांच्या जडणघडणीत असलेले संस्कृत भाषेचे महत्त्व या निमित्ताने सर्वांना समजले. वर्गाच्या सुरुवातीला संस्कृत भाषेविषयी वाटत असलेली भीती कमी होऊन वर्गाचा समारोप सर्वांनी संस्कृतमधून मनोगत व्यक्त करून केला. यानिमित्ताने कार्यकर्त्यांना नवीन शिकण्यास व त्यांचा आत्मविश्वास वाढण्यास मदत झाली.

'पठामि संस्कृतम् नित्यम् । वदामि संस्कृतम् सदा । ध्यायामि संस्कृतम् सम्यक । वंदे संस्कृत मातरम् ।'

सरस्वती देवीला वंदन करून आम्ही १० दिवसांच्या संस्कृत संभाषण वर्गाची सुरुवात



केली. सोनाली ताई आणि शशिकांत सरांनी घेतलेल्या या प्रशिक्षण वर्गात स्वतःचा परिचय, योग्य शब्दांचा वापर, एकवचन, अनेकवचन अशा अनेक गोष्टी शिकता आल्या. या वर्गाचे फलित म्हणजे वर्गाच्या समारोपाच्या दिवशी प्रत्येक प्रशिक्षणार्थी संस्कृतमधून व्यक्त झाला. सूत्रसंचालन, पाहुण्यांचा परिचय, वर्गगीत, नाट्य सादरीकरण, दिनचर्या कथन, अनुभव कथन, आभार प्रदर्शन या सर्व गोष्टी आम्ही



संस्कृतमधूनच सादर केल्या. या शिबिरामुळे आमचा आत्मविश्वास वाढला. नवीन भाषा शिकल्यामुळे आमच्या दैनंदिन शब्दकोशात आणि ज्ञानात मोलाची भर पडली. या वर्गाचा उपयोग मुलांमध्ये काम करताना नक्कीच होईल याबाबत खात्री वाटते.

**- सौ. स्नेहा पाटणे,**
(बालवाडी शिक्षिका)

# दरवर्षी होणारी आईस्क्रीम पार्टी



पूर्वीचे बुवा आईस्क्रीम, आता गुजर मस्तानी आणि आईस्क्रीम. सध्या तिसरी पिढी व्यवसायात आहे यांची.

मालक श्री. गोगावले गेली १५ वर्षे 'स्व'-रूपवर्धिनीच्या पाकोळी बालवाडीतील बालचमू, त्यांचे पालक, शिक्षक, आणि सर्व कार्यकर्ते यांना मे महिन्यात शाळेच्या शेवटच्या दिवशी आईस्क्रीम पार्टी देतात. होय तब्बल १५ वर्षे. **अशा दृश्य अदृश्य हातांनी वर्धिनीचा गोवर्धन पर्वत उचलून धरला आहे.**

आवर्जून श्री. गोगावले यांना भेटायला व वर्धिनीच्या ४५ व्या वर्धापनदिनाचे निमंत्रण द्यायला सुश्री. पुष्पाताई व मी गुजर मस्तानीच्या दुकानात गेलो होतो. श्री. गोगावले अत्यंत साधे, मृदुभाषी असे एक उत्तम व्यावसायिक आहेत. यानिमित्ताने त्यांचा छान परिचय झाला आणि वर्धिनीशी असलेले त्यांचे नाते अजून दृढ झाले.

– श्री अरविंद केळकर

# स्पर्धा परीक्षा केंद्र - यशस्वी विद्यार्थी सत्कार समारंभ

महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील विद्यार्थी अधिकारी होण्याचे स्वप्न उराशी बाळगून वर्धिनीच्या स्पर्धा परीक्षा केंद्रात दाखल होतात. पूर्ण ताकदीने, आत्मविश्वासाने आणि कष्टाने दिवस-रात्र मेहनत करून अभ्यास करून अखेर त्यांना अपेक्षित यश प्राप्त होते. केंद्राची अधिकारी घडवण्याची उज्वल परंपरा याहीवर्षी अबाधित राखत राज्यसेवा परीक्षेमधून १० तर सरळ सेवा परीक्षांमधून २० पेक्षाही अधिक विद्यार्थी यावर्षी उत्तीर्ण झाले. या सर्व गुणवंतांचा सत्कार २५ मे रोजी वर्धिनीत श्री. रंगनाथ नायकवडे (IFS सेवानिवृत्त अधिकारी व यशदा आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने चालणाऱ्या यूपीएससी ट्रेनिंग सेंटरचे संचालक) यांच्या हस्ते झाला.

उपजिल्हाधिकारीपदी निवड झालेले श्री. सागर मुळीक, आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले, 'वर्धिनीच्या प्रसन्न आनंददायी आणि प्रेरणादायी वातावरणात अभ्यास करताना ताण कधी जाणवला नाही.'

'आर्थिक अडचणीच्या वेळी वर्धिनी पाठीशी उभी राहिल्यामुळे आणि शिष्यवृत्ती बॅचमध्ये आवश्यक ते सर्व मार्गदर्शन मिळाल्यामुळेच मी आज हे पद मिळवू शकले,' अशा भावना उज्वला टिंगरे यांनी व्यक्त केल्या.

**यशस्वी विद्यार्थी -** ◆ सागर मुळीक - उपजिल्हाधिकारी ◆ दीक्षा पाटील - उप गटविकासाधिकारी ◆ उज्वला टिंगरे - (ACST) ◆ पांडुरंग कोळेकर - Dy Eo ◆ कुलदीप भोलाणे, सिद्धांत कांबळे - DYCO ◆ अफनान शेख - STI ◆ हर्षली पवार - Excise Inspector ◆ समीक्षा अत्रे, पूजा कुऱ्हाडे - कर सहायक ◆ अर्जुन गायकवाड - पशुवैद्यकीय अधिकारी ◆ शंतनू बाचे, गजानन चव्हाण - लिपिक ◆ मनोज देसले - औषध निर्माण अधिकारी ◆ वरद पाटील, भालचंद्र हर्गीले - ज्युनिअर इंजिनिअर ◆ सागर मांडे - जलसंपदा विभाग ◆ पद्मसिंह चव्हाण - सर्व्हेअर ◆ महेश गंगावणे, तृप्ती पाटील, आशितोष जायभाये - शिक्षक ◆ पूजा पाडवी - ज्युनिअर इंजिनिअर ◆ नितीन देशमुख - नगर विकस गट अ ◆ संदीप रणदिवे - नगरपरिषद अभियांत्रिकी सेवा ◆ कृष्णा निकम - तलाठी ◆ महेश शरमाळे - आरोग्य सेवक ◆ अश्विन पारधी, अर्चना ढवळे - मंत्रालय लिपिक ◆ अमोल गुंठाळ - ◆ केतन कांबळे - तलाठी ◆ अक्षय फुंदे - सिव्हील इंजिनिअर ◆ सुमित पाटील - cm फेलोशिप ◆ दत्ता तांदळे - केमिकल असिस्टंट ◆ निरंजन पोट्वडे - ज्युनिअर इंजिनिअर